**परिचर(गट-ड) या पदावरुन वाहन चालक (गट-क) या पदावर पदोन्नती देणेबाबत.**

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था/वा.चा/ /२०१८
अहमदनगर दि. /१२/२०१८

**वाचा :** १.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा(सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट-६मधील ४(बारा)
२.सा.प्र.वि.कडील शा.निर्णय क्र.एसआरव्ही/१०८८/प्र.क्र.११/८८/१२ दि.२१/२/१९९४
३.सा.प्र.वि.कडील शा.निर्णय क्र.२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९ मार्च २००३
४.ग्रा.वि.व ज.सं.वि.कडील शा.निर्णय क्र.एपीटी-१००१/प्र.क्र.९६०/अस्था-८ दि.२७/६/०३
५.ग्रा.वि.व ज.सं.वि.कडील शा.निर्णय क्र.अपंग-२०१२/प्रक्र-२५०/अस्था-९ दि.१४/१/०११
६.सा.प्र.वि.कडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६बदि.१२/१२/११
७.वित्त विभागाकडील शा.निर्णयक्र.वाहन२०१०/प्र.क्र.५०/१०/विनियम दि.१०/१/२०११
८.ग्रा.वि.वपं.राजविभागाकडील शा.निर्णय क्र.एपिटी-२०१२ प्र.क्र.२५१/आस्था८ दि.६/९/१२
९.मा.सहाय्यक आयुक्त,नाशिक कडील पत्र क्र.मावक/कार्या१८/कावि१/एसआर/२१७/१५दि२२/१२/१५
१०.मा.विभागीय आयुक्त,नाशिक ना हरकत प्रमाणपत्र क्र.साशा/१/२/अतिसंवर्ग/८८७१/१६दि.१७/५/१६
११.मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र.बीसीसी-१७/प्र.क्र. ३१२/ए/१६-ब, दि.२९/१२/२०१७
१२.पदोन्नती निवड समितीचे मंजुर इतिवृत्त दि.०२/११/२०१८

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ६ मधील ४ (बारा) नुसार परिचर वर्ग-४ या संवर्गातील तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल व संदर्भ क्र.८ अन्वये विहित केलेली अर्हता धारण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग ४) मधील योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नेमणुका करण्याबाबत तरतुद आहे.

त्यानुसार संदर्भ क्र.११ च्या अनुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत परिचर गट-ड या पदावर कार्यरत असणा-या खालील कर्मचा-यांना वाहन चालक गट-क या पदावर वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.१९००/- मध्ये तात्पुरती पदोन्नती या आदेशान्वये देण्यात येत असुन त्यांची रकाना क्रमांक ७ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | सध्याचे ठिकाण | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री भारत सुभाष नागवडे | परिचर | पवैद कोळगांव ता श्रीगोंदा | मराठा-खुला | खुला | आरोग्य विभाग,जिल्हा परिषद अहमदनगर. |
| २ | श्री हरिभाऊ भास्कर उगलमुगले | परिचर | पंचायत समिती शेवगांव | वंजारी-भजड | खुला | लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद अहमदनगर. |
| ३ | श्री वैभव विजय चव्हाण | परिचर | पंचायत समिती शेवगांव | मांग-अनु जाती | खुला | पंचायत समिती कोपरगांव |

सदरची पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आली असल्याने उक्त कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेकरीता त्यांच्या कार्यालय प्रमुखांनी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन संबंधितास पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. सदर कर्मचा-यांनी **पदस्थापनेच्या ठिकाणी पंधरा दिवसाचे आत हजर व्हावे**. उक्त कर्मचा-यांस पदोन्नतीचे ठिकाणी हजर होणेकामी शासन प्रचलित नियमानुसार वाटचाल प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवा पुस्तकामध्ये घेण्यात यावी. **तसेच अ नं २ चे कर्मचारी यांनी मा पोलीस अधिक्षक,अहमदनगर यांचेकडुन त्यांचे चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र सादर केलेनंतरच त्यांना हजर करुन घ्यावे.**

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संकेतांक क्रमांक २०१८१२१४०४००५३ असा आहे.

स्वाक्षरी/-
(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

१. श्री भारत सुभाष नागवडे,परिचर.
**व्दारा व प्रत-गट विकास अधिकारी,पं स श्रीगोंदा.**

२. श्री हरिभाऊ भास्कर उगलमुगले
**व्दारा व प्रत-गट विकास अधिकारी,पं स शेवगांव.**

३ .श्री वैभव विजय चव्हाण,परिचर.
**व्दारा व प्रत-गट विकास अधिकारी,पं स शेवगांव.**

द्वारा व प्रत- **संबधित परिचरांना पदोन्नतीचे ठिकाणी हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करावे.**

**द्वारा व प्रत** :१.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर.
२.कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद अहमदनगर.
३.गट विकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगांव
**२/- उक्त कर्मचारी हजर होताच हजर अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.**

प्रत : मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव रवाना.
प्रत : कार्यासन-अस्था-४, साप्रवि-१,जि.प.अ.नगर

**(स्थळप्रतीवर मा मु का अ यांची स्वाक्षरी असे)**

(वासुदेव सोळंके)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहमदनगर